

## मुंबई-दिल्ली डेडिकेटेड फ्रेट कॉरिडोर

मालवाहतूक अत्यंत वेगात करणे शक्य व्हावे, यासाठी दिल्ली ते मुंबई दरम्यान स्वतंत्र रेल्वेमार्ग तयार करण्याचा निर्णय तत्कालीन केंद्र सरकारने घेतला. त्यानुसार सन २००६मध्ये डेडिकेटेड फ्रेट कॉरिडोर कॉर्पोरेशन ऑफ इंडियाची स्थापना करण्यात आली. पूर्व व पश्चिम डीएफसीसाठी देशात एकूण ३ हजार ३६० किलोमीटरचा नवा मार्ग तयार केला जात असून त्यावर सुमारे ८१ हजार ४५९ कोटी रुपये इतका खर्च होणार आहे. अनेक राज्यांत या मार्गाचे काम सुरूदेखील झाले आहे. या कामावर २८ हजार ३८८ कोटी रुपये खर्च झाले आहेत. डोंबिवली-कल्याणातील १८ हेक्टर जमीन या प्रकल्पात जाणार आहे. त्यापैकी जवळपास सुमारे ९५ टक्के जमीन सरकारने संपादित केली आहे. त्यासाठी ३६० कोटी रुपये भरपाई देण्यात येत आहे. काही जमीन मालकांनी या प्रकल्पासाठी जमीन दिली असली तरी त्याची भरपाई अद्याप आपापसातील वादांमुळे स्वीकारली गेली नाही. अशा जमीन मालकांची भरपाईची रक्कम न्यायालयात जमा करून हा प्रकल्प रेटला जात आहे. बहुतांश जमीन सरकारच्या ताब्यात आल्याने या प्रकल्पात अडथळा राहिलेला नाही.

dt 4/2/2018

मुंबई TIMES
ठाणे PLUS